सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.वाशी, यांचे कार्यालय

ग्रामीण रूग्णालयासमोर, वाशी, ता.वाशी, जि.उस्मानाबाद

Email:arwashi@rediffmail.com दुरध्वनी क्रमांक :- ०२४७८-२७६०१३

(५५५ अंक्र./वि.१/२०१६ दि.२८/९/२०१६)

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश**

**वाचा :**

१. या कार्यालयाची नोटीस जा.क्र. वि-१/सहसं/नि/क/७३ दिनांक / /२०१६

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय व ७७ अ.

ज्याअर्थी ------ विविध कार्यकारी सेवा ------------------------

सहकारी संस्था म. ---- पिंपळवाडी ------------- ता.वाशी जि.उस्मानाबाद चे विद्यमान संचालक मंडळाची मुदत दिनांक ०८/०८/२०१६ रोजी संपली आहे.

ज्याअर्थी संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक घेणेकरीता अद्यापर्यंत संस्थेने मतदार याद्या या कार्यालयात सादर केलेल्या नाहीत तसेच निवडणूक निधीचा भरणा केलेला नाही, निवडणूक घेणेकामी कोणतीही कार्यवाही केली नाही. यावरून संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ हे हेतूपुरस्सर निवडणूक घेणेकामी दिरंगाई करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (आय) मध्ये समितीची मुदत संपण्यापुर्वी समितीची निवडणूक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविणे आणि तिच्या व्यवस्थेसाठी सहाय्य करणे हे समितीचे कर्तव्य असेल आणि समितीने तिची निवडणूक घेणेसंबंधात उक्त प्रमाणे बुध्दीपुरस्सर कसुर केली असेल तर, आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव मुदत संपण्यापुर्वी समितीची निवडणूक घेता आली नसेल तर, समितीचे सदस्य त्यांचे अधिकारपद धारण करण्याचे बंद करतील आणि अशा परिस्थितीत निबंधक अधिनियमाच्या कलम ७७ (अ) अन्वये योजिल्याप्रमाणे कार्यवाही करतील अशी तरतूद आहे. त्यानुसार सदर संस्थेने निवडणूक घेणेकामी काहीही कार्यवाही केलेली नाही, त्यावरून संस्थेने सदर तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे.

ज्याअर्थी वरील वाचा क्र. १ अन्वये सदर संस्थेस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१) मधील तरतुदीनुसार संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ निष्प्रभावित करून त्यांचे जागी प्राधिकृत अधिकारी / प्रशासक यांची नेमणूक का करण्यात येवू नये, अशी नोटीस देण्यात येवून संस्थेस दिनांक१५/९/२०१६ पर्यंत आपले म्हणणे सादर करणेस कळविण्यात आलेले होते.परंतू सदर संस्थेने वरील नोटीसचे उत्तरादाखल आजपर्यंत कसलेही म्हणणे या कार्यालयास सादर केलेले नाही.

त्याअर्थी ------ विविध कार्यकारी सेवा ------------------------

-------------------------------------------सहकारी संस्था म.---पिंपळवाडी-------------

ता.वाशी जि.उस्मानाबाद या संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१) मधील तरतुदीनुसार प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक झाले असल्याचे निष्कर्षाप्रत आल्यानुसार खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**आदेश**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे ७७ अ (१) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी एम.एल.शिंदे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता.वाशी जि.उस्मानाबाद या आदेशाद्वारे ----विविध कार्यकारी सेवा---------- सहकारी संस्था म. ---पिंपळवाडी------- ता.वाशी जि.उस्मानाबाद या संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करून त्यांचे जागी प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री. व्ही.एन. मेंढा शाखा व्यवस्थापक यांची नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी उक्त कलमामध्ये विहित केलेल्या मुदतीत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

प्रस्तुतचा आदेश आज दिनांक २६ सप्टेंबर २०१६ रोजी माझे स्वाक्षरीने व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत करण्यात आला आहे.

स्थळ :- वाशी

दिनांक :- २६/०९/२०१६

(एम.एल.शिंदे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था ता.वाशी

प्रति,

श्री. व्ही.एन. मेंढा शाखा व्यवस्थापक उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा पारा तथा प्राधिकृत अधिकारी ---विविध कार्यकारी सेवा------------ सहकारी संस्था म.---पिंपळवाडी------ ता.वाशी जि.उस्मानाबाद.

प्रत :-

१. श्री. ------------------------------------------------------------------ चेअरमन / व्हा. चेअरमन संचालक / संचालिका ---विविध कार्यकारी सेवा------- सहकारी संस्था म.---पिंपळवाडी------ ता.वाशी जि.उस्मानाबाद.

२. सचिव ---विविध कार्यकारी सेवा--------- सह.संस्था म. पिंपळवाडी ता.वाशी

३. कार्यकारी संचालक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि.उस्मानाबाद.

४. मा. जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था उस्मानाबाद यांचे सेवेत सविनय सादर.

५. मा. जिल्हा विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था उस्मानाबद यांचे सविनय सादर.

(एम.एल.शिंदे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था ता.वाशी